## -: प्रेसनोट दिनांक - ३१/०१/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक विनोद आप्पासाहेब कांबळे, वय ४४, तलाठी - सजा ओकोली/अतिरिक्त कार्यभार - पणुंद्रे, सध्या रा. येळाणे, ता. शाहुवाडी, मुळ रा. वसगडे ता. करवीर, जि. कोल्हापूर वर्ग-३ यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांचे मेव्हणीने पणुंद्रे ता. शाहुवाडी येथे जमिन खरेदी करणेसाठी व्यवहार ठरवला होता. परंतु सदर जमिनीचे ७/१२ पत्रकी पणुंद्रे गावचे विकास सेवा सोयासटीचा बोजा नोंद असलेने संबंधित सोसायटीकडुन बोजा कमी करणेचे पत्र घेवुन ७/१२ पत्रकी बोजा कमी करणेकरिता जमिनीचे मुळ मालकांचेवतीने तक्रारदार यांनी तलाठी विनोद कांबळे यांचेकडे अर्ज दिला होता. त्यानंतर सदर जमिनीचा खरेदी व्यवहार तक्रारदार यांचे मेव्हणीचे नावे रितसर दुय्यम निबंधक, शाहुवाडी येथे पुर्ण झाला होता. त्यानुसार तक्रारदार यांचे मेव्हुणीचे नावे खरेदी केलेले जमिनीचे ७/१२ पत्रकी मालकी हक्कामध्ये त्यांचे नाव नोंद करणेसाठी त्यांनी तलाठी कांबळे यांचेकडे अर्ज केला होता. तक्रारदार यांचे मेव्हुणीचे पती मयत असलेने सदर कामासंदर्भात पाठपुरावा तक्रारदार स्वत: करत होते. तक्रारदार यांनी वेळोवेळी बोजा कमी करणे व ७/१२ पत्रकी नाव नोंद करणेसाठी तलाठी विनोद कांबळे यांची भेट घेवुन पाठपुरावा केला होता. दि. २९/०१/२०१९ रोजी तक्रारदार यांनी तलाठी कांबळे यांची भेट घेतली असता तलाठी कांबळे यांनी कर्जाचा बोजा कमी करणे व मालकी हक्कात नाव नोंद करून नवीन ७/१२ उतारा देणेकरीता ५,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ३१/०१/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे तलाठी विनोद कांबळे यांचेविरुध्द तक्रारी अर्ज दिलेला आहे.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक ३१/०१/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये तलाठी विनोद आप्पासाहेब कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे तक्रारदार यांचे मेव्हुणीने खरेदी केलेल्या जमिनीचे ७/१२ उता-यामधील कर्जाचा बोजा कमी करणे व मालकी हक्कामध्ये नाव नोंद करून नवीन ७/१२ उतारा देणेसाठी रुपये ५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक ३१/०१/२०१९ रोजी तलाठी विनोद आप्पासाहेब कांबळे यांचेविरुध्द मलकापूर येथील सोमवार पेठ गल्लीतील तलाठी कार्यालय येथे सापळयाचे आयोजन केले असता तलाठी विनोद आप्पासाहेब कांबळे यांनी तक्ररदार यांचेकडून तलाठी कार्यालयाचे खालील बाजुस असले सोमवार पेठ गल्लीत पंच साक्षीदारांसमक्ष ५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द शाहुवाडी पोलीस ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. संदिप दिवाण पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. राजकुमार गायकवाड, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे तसेच श्री. गिरीष गोडे, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार, श्री. मारूती पाटील, पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार शाम बुचडे, पोलीस नाईक शरद पोरे व नवनाथ कदम, पोलीस कॉन्स्टेबल मयुर देसाई ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**

**३) श्री.गिरीष गोडे , पो.उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर ८१०८६६०७०७ ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**